Helping People ... To Help Themselves

Registered under Society Registration Act, Bhopal, M.P. Registration No – BPL/1973U/s 44, 10775/2002

Registered Office: - Yuva rural Association, 36, Green Avenue, Chuna Bhatti, Kolar Road, Bhopal – 462016.

युवा रूरल असोसिएशन ही स्वयं-सेवी संस्था गेली २२ वर्षे विदर्भातील विविध विकास विषयक प्रश्नावर कार्य करीत आहे. लोकांना त्यांच्या विकासाविषयी सर्व बाजूनी सक्षम करणे हा आमच्या कामाचा गाभा आहे. त्यांच्या संस्था व संघटना निर्माण करून सामूहिक पातळीवर हे साध्य करण्यासाठी आमचे प्रयत्न असतात. विदर्भात आत्ता पर्यंत तीन शेतकरी कंपन्या स्थापना करून त्यांना लहान व छोट्या शेतकरण्या जोडून दिले. दोन महिला सहकारी पत संस्था स्थापना करून त्या अतिशय उत्तम चालतात.

अलीकडेच नागपूर व भंडारा जिल्ह्यात १७,००० कुटुंबांमध्ये बायोगॅस युनिट्स स्थापित करून दिले आहेत. वाशिम, अकोला व अमरावती जिल्ह्यात अनेक गावांमध्ये स्थानिक पिण्याच्या पाण्यावर प्रक्रिया करून शुद्ध पेय जल उपलब्ध करणारे प्लांटस ग्रामीण लोकांसाठी स्थापित केले आहेत. शाश्वत शेती साठी २००२ पासून विविध प्रयत्न तसेच प्रमाणीकरण प्रक्रिया राबवल्या जात आहेत. विदर्भातील शेतकरी आत्महत्या या प्रश्नावर प्रचंड मोठ्या प्रमाणात कार्य केले/सुरू आहे.





पूर्व विदर्भात जंगलात राहणाऱ्या लोकांच्या उपजीविके साठी यशस्वी प्रयत्न सुरू आहेत. मृदा व जल संधारणाची मोठी कामे संस्थेने राबवली. संरक्षित जल सिंचन प्रयोग मोठ्या प्रमाणात यशस्वीरित्या राबवविले, ज्यामुळे लाभार्थी शेतकऱ्यांचे वार्षिक उत्पन्न दुप्पट झाले. ग्रामीण समुदायाचे उत्पन्न वाढवण्यासाठी ‘बकरी पालन’ सारख्या उपक्रमांना अधिष्ठान निर्माण करून दिले आहे. असे अनेक यशस्वी प्रयोग संस्थेने गेल्या २२ वर्षात लोकांच्या सहयोगातून राबवले.

विदर्भातील सुमारे 45 हजार शेतकरी, ३० हजार महिला व १५-२० हजार युवक अशा प्रक्रियांमध्ये स्वयंसेवक म्हणून जोडले गेले आहेत. आणि एकूण २.५० लाखांहून अधिक कुटुंबांना संस्थेच्या कामाचा लाभ मिळाला आहे. विदर्भातील शेतकरी आत्महत्या कमी करण्यामध्ये संस्थेचे मोठे योगदान राहले आहे.

गोंदिया आणि गडचिरोली जिल्ह्यातील सड़क अर्जुनी आणि भामरागड तालुक्यात आदिवासी समुदाय यांची उपजीविका चिरंतन व्हावी आणि त्यांचे स्थलांतर थांबावे या करिता म्हणून माथा ते पायथा आणि मनरेगा च्या माध्यमातून पाणलोट विकास, जंगल, जल, जमीन, संवर्धनाचे कार्य संस्था करीत आहे. यातून जवळपास पुढच्या 5 वर्षात 80,000 हेक्टर जमीन ही ओलिता अंतर्गत आणून बारमाही शेती चे उत्पादन होईल. मराठवाडा मधील हिंगोली तालुक्यात जल संवर्धन, जमीन ओलिताखाली आणणे, इत्यादि करिता कार्य करीत आहे.



अजून असे बरेच काम करणे बाकी आहे. संस्थेला या कामासाठी विविध मार्गांनी निधी उपलब्ध होत गेला.

आता आम्ही आपल्यासारख्या दानशूर मान्य वरांपर्यंत देखील पोहोचत आहोत. आपल्याला 80G अंतर्गत वार्षिक आयकर सूट मिळेल.

आपला कृपाभिलाषी

दत्तात्रय पाटील
मुख्य कार्यकारी अधिकारी






# युवा रूरल असोसिएशन

www.yraindia.org

+९१ - ९४२२८ २७९४८
+९१ - ७०८३३२८१५४

info@yraindia.org

प्लॉट क्र. १९, दुसरा मजला, न्यू आकाश नगर, संत गजानन हॉल जवळ, मानेवाडा रिंग रोड, नागपूर-३४

/yuvaruralassociationnagpur

/yuvaruralassociation




